# जगदीशचंद्र बोस यांचे विज्ञानातील कार्य हे जगाला प्रेरणादायी : प्रा.डॉ. वासंबेकर



कोल्हापूर : आचार्य जगदीशचंद्र बोस हे एक भारतीय जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ होते. त्यांनी वनस्पतींमध्ये अतिउच्च लहरींचा वापर करून संदेशवहनाचे प्रात्यक्षिक केले. तसेच जगदीशचंद्र बोस यांनी सन १९१७ मध्ये कोलकाता येथे बोस रिसर्च इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन केली. बोस यांचे विज्ञानातील कार्य हे जगाला प्रेरणादायी असून त्यांचे जीवनकार्य अभ्यासण्याची गरज असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एन. वासंबेकर यांनी व्यक्त केले.

ते विवेकानंद महाविद्यालयामधे इलेक्ट्रॉनिक्स व भौतिकशास्त्र विभागामार्फत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते. याप्रसंगी प्रा. सी. जे. कांबळे, डॉ. एस. आय. इनामदार, डॉ. एच. एम. पाटील, प्रा. गोरे व प्रा. जी. बी. शिंगे, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. एन. पी. मोटे यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. पूनम जाधव केले तर प्रा. पी. आर. कागडे यांनी आभार मानले.